6th Sugar Asia

www.sugarasia.net

| Publication | Loksatta | Language | Marathi |
|---|---|---|---|
| News | *6th Sugar Asia 2014, an international Conference and Expo on Sugar* | Date | 19th Feb. 2014 |
| Edition | Mumbai | Page No. | 10 |


लोकसत्ता

★ मुंबई, बुधवार, १९ फेब्रुवारी २०१४ १०


# साखर उद्योगावरील आंतरराष्ट्रीय परिषद व प्रदर्शन मुंबईत

**मुंबई:** इथनॉलनिर्मिती, मद्यनिर्मिती (डिस्टिलरी), वीजनिर्मिती, जैव ऊर्जा आणि उसाचे मळे वगैरे साखर उद्योगाशी निगडित सर्व अंगांमधील नवीन तंत्र, तंत्रज्ञान व सामग्रीचे आशिया खंडातील सर्वात मोठे प्रदर्शन म्हणून ख्याती असलेले 'शुगर एशिया २०१४'ची यंदाची सहावी आवृत्ती मुंबईत योजण्यात आली आहे. येत्या २७ आणि २८ फेब्रुवारीला गोरेगाव (पूर्व) येथील मुंबई प्रदर्शन संकुलात त्याचे आयोजन दिल्लीत मुख्यालय असलेल्या नेक्सजेन एक्झिबिशन्सने केले आहे. भारतासह अमेरिका, हॉलंड, झेक प्रजासत्ताक, तुर्कस्थान, इराक, श्रीलंका, इंडोनेशिया, जर्मनी असे २० देशांतील कंपन्या प्रदर्शनात सहभागी होत आहेत.